



# महाराष्ट्र शासन

# अर्थसंकल्प :२०१४-१५

# महिला व बालविकास विभाग

## समर्थन


**अर्थसंकल्प अध्ययन केंद्र**

११५, धुरी कॉमर्स प्लाझा, वसई रोड रेल्वे स्टेशन जवळ, वसई (पू), जि. ठाणे -४०१ २०८

० २५०-२३९०१०३/२३९०१०४

Email: samarthanmumbai97@gmail.com Website: www.samarthanadvocacy.org

समर्थन

स्व. सदानंद वर्दे
(संस्थापक, अध्यक्ष)

अध्यक्ष : श्री. चंद्रशेखरप्रभू
उपाध्यक्ष: श्री.टी.के.चौधरी
कार्याध्यक्ष: श्री. विवेक पंडित

**संपादक:**

**मुक्ता भारती**

**-विश्लेषक-**

**रुपेश कीर -९८९२९३९६१७**

**गुरुनाथ सावंत -९९६७७२२९०७**

**सचिन मर्ती:- ९९७५१२३५८९**

नोंदणी क्रमांक:
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी

प्रकाशक (पत्रव्यवहार):
समर्थन – ११५, धुरी कॉमर्स प्लाझा, वसई रोड रेल्वे स्टेशन समोर, वसई (पू),
जि. ठाणे – ४०१ २०८
Email:
samarthanmumbai97@gmail.com
www.samarthanadvocacy.org

**लोकशाही बळकट करण्याकरिता**
**उपेक्षितांचे 'समर्थन'**

## समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे 'समर्थन'. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

### 'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर

◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.

◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.

◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.

◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.

◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.

◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.

◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.

◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.

◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# महिला व बाल विकासबाबत आर्थिक पाहणीतील महत्वाची निरीक्षणे

**शिक्षण:**

- वर्ष २०१२-१३ मध्ये इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत (प्राथमिक ) शिकणाऱ्या मुलींची संख्या ७ हजार ५९९ इतकी होती, तर इयत्ता नववी इयत्ता ते बारावीपर्यंत (माध्यमिक) शिकणाऱ्या मुलींची संख्या २,५९४ इतकी कमी झालेली आढळली, म्हणजेच वर्ष २०१२-१३ या वर्षात प्राथमिक शाळेतून माध्यमिक शाळेत जाताना ५हजार ००५ मुलींची गळती झाली .

**आरोग्य :**

- राज्यातील माता मृत्यूदर वर्ष २०१०-१२ कालावधीत प्रति लाखास ८६ इतका होता.
- बालकांच्या (० ते ५ वर्षे) पोषण श्रेणीनिहाय टक्केवारीनुसार **वर्ष २०१२-१३** मध्ये **साधारण कमी वजनाच्या बालकाचे प्रमाण ९.४ टक्के** व **अति कमी वजनाच्या बालकाची टक्केवारी १.३ टक्के** इतके होते, ते **वर्ष २०१३-१४+ (नोव्हेंबर २०१३)** पर्यंत अनुक्रमे **९.६टक्के** व **१.५टक्के** इतके वाढले होते.
- वर्ष २०१२-१३ मध्ये पूरक पोषण आहार कार्यक्रमातंर्गत ग्रामीण (आदिवासी भागासह) एकुण खर्च रु. १ हजार ०६९ कोटी ४४ लाख इतका करण्यात आला होता, तर वर्ष २०१३-१४ (नोव्हेंबर २०१३) मध्ये खर्चाचे प्रमाण रु. ५३८ कोटी ६९ लाख इतके कमी झाले होते.

**रोजगार :**

- एकुण रोजगार क्षेत्रात महिला कर्मचाऱ्यांचे प्रमाण ३१.५ टक्के आहे.
- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत महिलांचे रोजगारांमध्ये वाटा वर्ष २०११२-१३ मध्ये ४४.६ टक्के इतका होता, तर वर्ष २०१३-१४ मध्ये (डिसेंबर २०१३ पर्यंत) हे प्रमाण ४३.४ टक्के इतके होते.
- एकूण संघटित क्षेत्राच्या रोजगारामधील महिला रोजगारांची टक्केवारी १९.४ टक्के इतकी होती.
- राज्यात काम करणाऱ्या स्त्रियांचा सहभाग दर ३१.०६ इतका आहे.


**स्त्री-पुरुष प्रमाण :**

- एकूण लोकसंख्येमध्ये राज्यातील स्त्रियांचे प्रमाण दर हजारी पुरुषांमागे ९२९ इतके आहे त्या तुलनेत भारताची दर हजारी पुरुषांमागील स्त्रियांची संख्या ९४३ इतकी जास्त आहे.
- एकूण लोकसंख्येमध्ये बालकांमधील स्त्री-पुरूष प्रमाण (०ते ६वर्षे) २०११ मध्ये ८९४ इतके घसरले होते.
- राज्यात २कोटी ४४ लाख २२ हजार कुटुंबांपैकी २५ लाख १३ हजार (१०.२८ टक्के) कुटुंबांमध्ये महिला या कुटुंब प्रमुख आहेत.

# शासनाला महिला विकासाचे वावडे, सुधारित अंदाजांइतका निधी उपलब्ध करून देण्यास टाळाटाळ!

## महिला व बाल विकास विभागाचा अर्थसंकल्प

आलेख क्र.१ महिला व बालविकास विभागावरील खर्चाचे अंदाज व प्रत्यक्ष खर्च





| | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | ६२५.० | ७६६.३ | ८१४.९ | १०४३. | ६७९.७ | १९०९. | २४५३. | २७३८. | २९५१. | २८९३. |
| सुधारित अंदाज | ६४९.१ | ८२३.६ | १०१५. | ११०७. | १७४३. | १९५०. | २४८४. | २७३१. | २९१४. | |
| प्रत्यक्ष खर्च | ५९६.८ | ६८१.९ | ९२२.६ | ९५५.७ | १३४९. | १६३३. | २३८८. | २६६९. | | |

*(स्त्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका भाग- २ खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज)*

- वर्ष २००५-०६ पासून वर्ष २०१२-१३ पर्यंत सुधारित अंदाजांइतका निधी विभागास प्राप्त न झाल्याने प्रत्यक्ष खर्चाचे प्रमाण हे कमी होत गेलेले दिसून येते.
- वर्ष २००५-०६ ते २०१२-१३ पर्यंत सुधारित अंदाज हा सरासरी रु. १ हजार ५६२कोटी इतका असताना प्रत्यक्ष खर्च मात्र सरासरी रू. १ हजार ३९९ कोटी इतका होता.
- वर्ष २००९-१० मधील अर्थसंकल्पीय अंदाज रु. ६७९ कोटी ८० लाख होता मात्र प्रत्यक्ष खर्च हा रु. १ हजार ३४९लाख कोटी म्हणजे अर्थसंकल्पीय अंदाजांपेक्षा रु. ६६९ लाख २० कोटींनी अधिक झाला, अर्थसंकल्पीत अंदाजापेक्षा ९८ टक्क्यांनी खर्च जास्त होणे हे नियोजन विहिनतेचे (Bad Budgeting )उदाहरण आहे.
- वर्ष २०१४-१५मध्ये अर्थसंकल्पीय अंदाज रु. २ हजार ८९३ कोटी ७१ लाख इतका आहे. मात्र हा निधी २०१३-१४ अर्थसंकल्पीय अंदाज व सुधारित अंदाज या दोन्हीपेक्षा कमी आहे, त्यामुळे प्रत्यक्ष खर्चाचे प्रमाण देखील कमी असेल हे सहज दिसून येते.

# राज्य अर्थसंकल्पात महिला व बालकांसाठी निधी केवळ १.२२ टक्के!

आलेख क्र. २ महिला व बालविकास विभागाचे राज्य अर्थसंकल्पातील स्थान




| | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| टक्केवारी | ०.८ | ०.८८ | १.१२ | ०.९५ | १.१४ | १.४ | १.५६ | १.६१ | १.४७ | १.२९ |

*(स्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका भाग- २ खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज)*

(वर्ष २०१३-१४ चे सुधारित व वर्ष २०१४-१५ चे अर्थसंकल्पीय अंदाज)

- राज्य अर्थसंकल्पाच्या तुलनेत महिला व बाल कल्याण विभागावरील खर्चाचे सरासरी प्रमाण केवळ १.२२ टक्के.
- वर्ष २००५-०६ ते २००६-०७ व वर्ष २००८-०९ मध्ये विभागासाठी राज्य अर्थसंकल्पाच्या तुलनेत १ टक्का निधीदेखील उपलब्ध केला गेला नाही.
- वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ चे सुधारित व अर्थसंकल्पीय अंदाज हे खर्चाच्या प्रमाणात वाढ दर्शवित असले तरी हे अंदाज वास्तवात येणे महत्त्वाचे ठरेल, कारण वर्ष २०११-१२ मध्ये सुधारित अंदाजाचे प्रमाण १.६३ टक्के होते प्रत्यक्षात ते आता १.५६ टक्क्यांपर्यंत खाली आहे.
- वर्ष २०१२-१३ नंतर राज्य अर्थसंकल्पामध्ये महिला व बाल कल्याणासाठी करण्यात आलेले अर्थसंकल्पीय व सुधारित अंदाज हे कमी होताना दिसत आहेत त्या अनुशंगाने प्रत्यक्षात खर्चाचे प्रमाण देखील कमी होईल हे नक्की.

# महिला कल्याणाच्या योजना

## पुरोगामी महाराष्ट्रात महिला कल्याणाच्या योजनांकडे शासनाचे दुर्लक्ष!

वर्ष २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ११ कोटी २३ लाख ७४ हजार इतकी असून त्यापैकी ४८ टक्के म्हणजेच एकूण ५ कोटी ४१ लाख ३१ हजार इतक्या महिला आहेत. तर एकूण लोकसंख्येच्या तुलनेत स्त्री-पुरुष प्रमाण ९२९ असून बालकांमधील (०-६ वयोगट) स्त्री-पुरुष प्रमाण ८९४ इतके आहे.

वर्ष १९९४ मध्ये राज्यातील महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि सक्षमीकरणासाठी महिला धोरण तयार करून शासनाने महिला व बाल कल्याण विभागाची स्थापना केली. महिलांच्या विकासासाठी स्वतंत्र धोरण व विभाग स्थापन करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य होते. विविध विकासात्मक कार्यक्रम राबवून महिलांचा, प्रामुख्याने ग्रामीण महिलांचा सामाजिक तसेच आर्थिक दर्जा सुधारणे हे महिला व बाल विकास विभागाचे उद्दिष्ट आहे. .

महिला धोरण तयार करण्यामध्ये शासनाने जी तत्परता दाखविली ती प्रत्यक्ष धोरणाची अंमलबजावणी करताना मात्र अभावानेच आढळते. महाराष्ट राज्याने महिला सक्षमीकरणासाठी विविध योजना तयार केल्या असल्या तरी त्या प्रभावीपणे अंमलबाजवणी होतांना आढळत नाही. त्यातील काही योजना तर कागदोपत्रीच आहेत तर काही बंद करण्यात आलेल्या आहेत. त्यांची माहिती खालीलप्रमाणे:

**१. <u>जिजामाता महिला आधार विमा योजना</u>: वर्ष २००१-०२ पासून १ रुपयाही खर्च नाही!**

कुटुंब प्रमुखाचे अपघाती निधन झाल्यास त्याच्या विधवा पत्नीस अथवा मुली/मुलास रु.२५,००० एवढे एकरकमी अर्थसहाय्य या योजनेंतर्गत राष्ट्रीय विमा कंपनीकडून देण्यात येते. कायमस्वरूपी अपंगत्व आल्यासही अर्थसहाय्य दिले जाते. सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत पिवळे/भगवे रेशनकार्ड देण्यात आलेल्या १ कोटी ६०लाख कुटुंबाना शासनाने राष्ट्रीय विमा कंपनीबरोबर वाटाघाटी करून विम्याचे संरक्षण दिले होते. वार्षिक विमा हप्ता प्रति कुटुंब १ रुपया ७५ पैसे एवढा होता. त्याप्रमाणे रु. २ कोटी ८० लाख एवढी रक्कम कंपनीला मे, १९९९ मध्ये प्रदान करण्यात आली. प्रत्येक वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये वार्षिक हप्त्याची रक्कम प्रतिबिंबित होणे अपेक्षित असताना

**वर्ष २००१-०२ पासून या योजनेवर १ रुपयाही खर्च झालेला नाही. वर्ष २००९-१० मध्ये अर्थसंकल्पीय अंदाज रु. १ कोटी ८३ लाख ३३ हजार असताना प्रत्यक्ष खर्च मात्र काहीच नाही. तर वर्ष २०१०-११ ते २०१४-१५ पर्यत या योजनेसाठी कोणताही निधी अर्थसंकल्पीत करण्यात आलेला नाही. त्यामुळे शासनाने सदर योजना गुंडाळून ठेवली आहे किंवा नाही याबाबत काहीही खुलासा होत नाही.**

**२. <u>कामधेनु योजना</u> : वर्ष २०१०-११ ते २०१४-१५ पर्यत अर्थसंकल्पीय तरतूदच नाही?**

या योजनेंतर्गत नोंदणीकृत महिला संस्थांना पंचायत समित्या, जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिका, शासकीय कार्यालये, शासकीय संस्था, रुग्णालये, शाळा, महाविद्यालये, महामंडळे इत्यादींना लागणारे गणवेश, चादरी, उशांचे अभ्रे, रोग्यांचे कपडे, डस्टर, झाडू, खाद्यपदार्थ इत्यादींच्या पुरवठ्याचे काम देण्यात येते.

**वर्ष २००९-१० मध्ये अर्थसंकल्पीय अंदाज हा केवळ रु. ३३ हजार असताना प्रत्यक्ष खर्च हा रु. २९ हजार इतका केलेला आहे. तर वर्ष २०१०-११ पासून ते २०१४-१५ पर्यत म्हणजेच गेल्या पाच वर्षापासून सदर योजनेवर अर्थसंकल्पीय अंदाज करण्यात आलेले नाहीत म्हणजेच शासनाने ही योजना बंद केली आहे काय?**

**३. <u>हुंडा पद्धतीचे निर्मूलन</u>: खर्च जास्त होत असूनही निधी उपलब्ध करून देण्यास मात्र टाळाटाळ.**

हुंडा प्रतिबंधक कायद्याची (१९६१) अंमलबजावणी प्रभावीरित्या होण्यासाठी व हुंडा पद्धतीचे निर्मूलन होण्यासाठी या योजनेंतर्गत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली, शासकीय आणि अशासकीय सदस्यांचा अंतर्भाव असलेली समिती गठित करण्यात आली आहे. हुंड्याच्या अनिष्ट रुढीचे उच्चाटन करण्यासाठी, कायद्याबरोबर सामाजिक प्रयत्नांची जोड देण्याचा प्रयत्न केला जातो. जनजागरण, प्रचार व प्रसिद्धी याबरोबरच महिलांना कायदेशीर सहाय्य मिळण्यासाठी प्रयत्न करण्यात येतो.

**वर्ष २०१२-१३ मध्ये सदर योजनेसाठी रु. १५ लाख ७५ हजार इतका अर्थसंकल्पीय अंदाज असताना सुधारित अंदाज कमी करुन रु. १२ लाख ६० हजार इतका केला होता तर त्या समोर केवळ रु. ११ लाख ५ हजार इतका खर्च करण्यात आला. त्याच प्रमाणे वर्ष २०११-१२ चे अर्थसंकल्पीय अंदाज हे रू. २ लाख ८० हजार इतके असताना प्रत्यक्ष खर्च मात्र केवळ रु. २ लाख ४३ हजार इतकाच करण्यात आला होता. वर्ष २०१४-१५ मध्ये अर्थसंकल्पीय अंदाज रु. १० लाख ५० हजार इतका असून वर्ष २०१३-१४ चे सुधारीत अंदाज रु. १२ लाख ६० हजार इतका केलेला आहे प्रत्यक्षात खर्च मात्र मागील वर्षाचा अनुभव घेता कमीच करण्यात येईल.**

**४. देवदासी निर्वाह अनुदान देण्यासाठी जिल्हा परिषदांना सहायक अनुदान:**

देवदासी निर्वाह अनुदान योजनेंतर्गत ४० वर्षांवरील देवदासींना दरमहा रु. ५०० प्रमाणे निर्वाह अनुदान अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येते.

**सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील एकूण देवदासींच्या संख्येसाठी सर्व्हेक्षण होणे गरजेचे आहे जे राज्य शासन करीत नसल्याकारणाने प्रत्यक्ष लाभार्थ्यांची संख्या शासनापर्यंत पोहोचत नाही. त्याकारणाने खालील प्रमाणे नियोजनशुन्य तरतूदी करुन सुद्धा काहीही फायदा होणार नाही. त्याचप्रमाणे विशेष महत्त्वाचे म्हणजे वर्ष २०१३-१४ पासून सदर तरतूदी करणे देखील शासनाने सोडून दिले आहे.**

**योजनेवर वर्ष २०११-१२ मध्ये मात्र केवळ १ हजार रुपयांचा अर्थसंकल्पीय अंदाज हा सुधारित करुन रू. ४७ लाख ९८ हजार इतका करण्यात आला व त्यापैकी केवळ रु. ४४ लाख ९७ हजार इतका खर्च करण्यात आला होता. तर वर्ष २०१२-१३ मध्ये सदर योजनेसाठी केवळ रु. ३ लाख ६२ हजार इतका खर्च करण्यात आला, वर्ष २०१३-१४ चे सुधारित व वर्ष २०१४-१५ चे अर्थसंकल्पीय अंदाज पाहिले तर सदर योजनेसाठी कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही.**

*(वरील सर्व योजनांच्या माहितीचा स्त्रोत: अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका व कार्यक्रम अंदाजपत्रक)*

# महिलांवरील वाढते अत्याचार

## वर्ष २०१२ मध्ये महिलांवरील अत्याचारांबाबत १७ हजार ७९८ गुन्ह्यांची नोंद!

*(तक्ता. क्र १). महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण*

| अ.क्र. | गुन्हे | वर्ष | | | २०११च्या तुलनेत २०१२मधील गुन्ह्यांचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| | | २०१० | २०११ | २०१२ | (%) |
| १. | हुंड्यासाठी खून | २१४ | १८७ | १९४ | ३.७४ |
| २. | हुंड्यासाठी खुनाचा प्रयत्न | १३१ | १३४ | १०७ | -२०.१४ |
| ३. | हुंडाबळी | ३९३ | ३३९ | ३२९ | -२.९४ |
| ४. | हुंडा प्रतिबंधक कायदा | ४० | ४४ | ३३ | -२५ |
| ५. | पळवून नेणे व अपहरण | ११२४ | १२५२ | ११४० | -८.९४ |
| ६. | पती व पतीच्या नातेवाईकांकडून छळ | ७४३४ | ७१३६ | ७४१५ | ३.९० |
| ७. | विनयभंग | ३६६१ | ३७९४ | ३९३५ | ३.७१ |
| ८. | लैंगिक छळ | ११८० | १०७१ | १२९४ | २०.८२ |
| ९. | अनैतिक व्यापार | ३०६ | ३९० | ३६६ | -६.१५ |
| १०. | बलात्कार | १५९९ | १७०१ | १८३९ | ८.११ |
| ११. | आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणे | १३८० | ११६० | ११४६ | -१.२० |
| | **एकूण** | **१७४६२** | **१७२०८** | **१७७९८** | **३.४२** |

*(स्त्रोत: महाराष्ट्रातील गुन्हे- २०१२)*

- राज्यात 'हुंड्यासाठी खुन' या शिर्षा खाली दाखल झालेल्या गुन्ह्यांची संख्या २०११ साली १८७ इतकी होती व वर्ष २०१२ मध्ये त्यात वाढ होऊन ती १९४ इतकी झालेली आहे. वाढत जाणाऱ्या या गुन्ह्यांमुळे कायद्याची कोणालाही भीस्त नाही हे सिध्द होते.
- वर्ष २०११ मध्ये लैंगिक छळ या शिर्षाखाली दाखल झालेल्या गुन्ह्यांची संख्या १,०७१ होती, तर वर्ष २०१२ मध्ये १,२९४ इतकी वाढली, म्हणजेच वर्ष २०१२ मध्ये लैंगिक छळ या गुन्ह्यात २०.८२ टक्क्यांची वाढ झालेली आहे.
- वरील तक्ता पाहता, पती व पतीच्या नातेवाईकाकडून छळ, विनयभंग व बलात्कार या गुन्ह्यामध्ये वर्ष २०११ च्या तुलनेत वर्ष २०१२ मध्ये वाढ झालेली आहे.

# स्त्रियांवरील बलात्काराचे वाढते प्रमाण

*तक्ता क्र. २*

| वर्ष | १० वर्षांखालील | १०-१४ वर्षे | १४ -१८ वर्षे | १८-३० वर्षे | ३०-५० वर्षे | ५० वर्षांवरील | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१० | १०८ | १३४ | ५१५ | ६७५ | १६८ | ११ | १६११ |
| २०११ | १३६ | १७५ | ५३४ | ७२४ | १६९ | ७ | १७४५ |
| २०१२ | १२७ | १८८ | ६०९ | ७३५ | १६४ | २२ | १८४५ |
| **वाढ (२०११ मानाने २०१२ या वर्षी टक्केवारीत झालेली वाढ )** | **-६.६२** | **७.४३** | **१४.०४** | **१.५२** | **-२.९६** | **२१४.३** | **५.७३** |

(स्त्रोत: महाराष्ट्रातील गुन्हे- २०१२)

- वर्ष २०१२ मध्ये १४ ते १८ वर्षे वयोगटातील स्त्रियांवरील बलात्काराच्या घटनांमध्ये १४.०४ टक्क्यांनी वाढ झाली.
- १० ते १४ वर्षे वयोगटातील मुलींवर होणारे बलात्काराच्या प्रमाणात वर्ष २०१२ मध्ये ७.४३ टक्क्यांनी वाढ झाली आहे.
- राज्यात वर्ष २०११ मध्ये एकूण १,७४५ बलात्काराच्या गुन्ह्यांची नोंद झाली होती त्यात वाढ होऊन वर्ष २०१२ मध्ये त्यात १,८४५ इतकी वाढ झालेली आहे.

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग

महिलांच्या दर्जाचे रक्षण करण्याची सुनिश्चिती करण्यासाठी संविधानात विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. तसेच महिलांच्या दर्जाचे रक्षण करण्याची सुनिश्चिती करण्यासाठी संविधानात विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. या तरतुदींनुसार महिलांच्या बाबतीत भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १४,१५ व १६ द्वारे हमी देण्यात आलेले मूलभूत हक्क मिळवून देण्यास चालना देण्याच्या आणि विशेषत: समाजातील महिलांचा दर्जा व प्रतिष्ठा सुधारण्यासाठी संविधानाच्या अनुच्छेद ३८,३९,३९-अ आणि ४२ मध्ये प्रतिष्ठापित केलेल्या तत्त्वांना प्रत्यक्षात आणण्याच्या ध्येयाने महाराष्ट्र शासनाने, १९९३ यावर्षी राष्ट्रीय महिला आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना करण्यात आली.

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयात दाखल झालेल्या**
**८ हजार ४८७ तक्रारी पैकी ३ हजार ४३ तक्रारी प्रलंबित.**

*(तक्ता क्र . ३)* महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयात दाखल झालेल्या तक्रारी

| तपशील | एकूण नोंद झालेल्या तक्रारी | | | | प्रलंबित तक्रारी | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २००८-०९ | २००९–१० | २०१०-११ | एकूण | २००८-९ | २००९-१० | २०१०-११ | एकूण | ९ चे ५ शी प्रमाण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| वैवाहिक समस्या | १,१७८ | १,१९० | २१२९ | **४४९७** | ५१३ | ४८० | ४९५ | **१४८८** | ३३.०८ |
| न्यायालयीन प्रलंबित दावे | — | — | - | - | — | — | - | | - |
| हुंडाबळी | ७ | ७ | - | **१४** | ५ | ४ | - | **९** | ६४.२८ |
| बलात्कार | १२३ | १२० | २३५ | **४७८** | ३७ | ३७ | ७३ | **१४७** | ३०.७५ |
| मालमत्ता विषयक समस्या | १३७ | १३० | ५३४ | **८०१** | ४० | ४० | १४१ | **२२१** | २७.५९ |
| कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ | १२ | १३ | ०६ | **३१** | ११ | ११ | ०४ | **२६** | ८३.८७ |
| कामाच्या ठिकाणी होणारा छळ | ९५ | ९५ | ११७ | **३०७** | ५० | ५० | ५१ | **१५१** | ४९.१८ |
| इतर | ६१४ | ३१३ | १४३२ | **२३५९** | ८८ | ८८ | ८२५ | **१००१** | ४२.४३ |
| **एकूण** | **२,१६६** | **१,८६८** | **४४५३** | **८४८७** | **७४४** | **७१०** | **१५८९** | **३०४३** | **३५.८५** |

*(स्त्रोत: महिला व बालविकास विभाग कार्यक्रम अंदाजपत्रक २०१३-१४)*

- वर्ष २००८-०९ ते २०१०-११ या तीन वर्षाच्या कालावधीत ८ हजार ४८७ तक्रारींची नोंद. त्यापैकी ५ हजार ४४४ तक्रारी निकाली निघाल्या तर ३ हजार ०४३ (३५.८५ टक्के) तक्रारी प्रलंबित आहेत.
- वैवाहिक समस्यांबाबत वर्ष २००८-०९ ते २०१०-११ या कालावधीमध्ये ४ हजार ४९७ तक्रारी नोंदविण्यात आल्या त्यापैकी ३ हजार ०९ तक्रारी निकाली निघाल्या तर १ हजार ४८८ (३३.०८ टक्के) तक्रारी प्रलंबित आहेत.
- वर्ष २००८-०९ ते २०१०–११ या तीन वर्षात कामाच्या ठिकाणी होणाऱ्या छळ या तक्रारींची संख्या ३०७ तर प्रलंबित तक्रारी १५१ (४९.१८) इतक्या होत्या.
- वर्ष २००८-०९ ते २०१०-११ या तीन वर्षात बलात्कारा संबंधीत ४७८ तक्रारी दाखल झाल्या असून त्यापैकी २०५ तक्रारी निकाली काढण्यात आल्या तर उर्वरित १४७ (३०.७५ टक्के) तक्रारी प्रलंबित आहेत.

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाकडे महिला अत्याचाराच्या विरोधात अनेक तक्रारी दाखल करण्यात येतात. आयोगाकडे तक्रार दाखल केल्यानंतर या प्रकरणी आयोग काहीच कार्यवाही करू शकत नाही असे संबंधितांना तात्काळ सांगण्यात येते, त्यामुळे तक्रारदार महिलांचे खच्चीकरण होते व तक्रारदार महिलांना नैराश्य येते. आयोगाकडे पीडित महिलेने तक्रार दाखल केल्यानंतर संबंधितांचे मनोबल वाढविण्यासाठी त्यांना आधार वाटण्यासाठी तक्रारीची उचित दखल घेण्यासाठी रुपरेषा ठरविण्यात यावी. यासाठी गरज वाटल्यास कार्यशाळा आयोजित करून संबंधितांना प्रशिक्षण देण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.

*(स्रोत: महिलांचे हक्क व कल्याण समिती चौदावा अहवाल २००७-०८)*

## एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत १२ हजार ८२५पदे रिक्त!

*(तक्ता क्र ४) एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत रिक्त पदांचा तपशील*

| अ.क्र. | संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | रिक्त पदांचे मंजूर पदांशी प्रमाण (%) |
|---|---|---|---|---|---|
| १ | बा.वि.प्र.अ. | ५५३ | ३२० | २३३ | ४२.१३ |
| २ | सहा. बा.वि.प्र.अ. | ८६ | ८६ | - | - |
| ३ | मुख्यसेविका | ३,८९९ | ३,३५५ | ५४४ | १३.९५ |
| ४ | अंगणवाडी सेविका | ९७,४७५ | ९४,८४७ | २,६२८ | २.६९ |
| ५ | अंगणवाडी मदतनीस | ९७,४७५ | ९१,२५५ | ६,२२० | ६.३८ |
| | **एकूण** | **१,९९,४८८** | **१,८९,८६३** | **९,६२५** | **४.८२** |

*(कार्यक्रम अंदाजपत्रक :वर्ष २०१४-१५)*

- एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत बाल विकास प्रकल्प अधिका-यांच्या मंजूर ५५३ पदांपैकी २३३ (४२.१३टक्के) पदे रिक्त होती.
- एकात्मिक बाल विकास प्रकल्पाअंतर्गत अंगणवाडी सेविकांची २हजार ६२८ पदे रिक्त तसेच अंगणवाडी मदतनीसांचीही ६ हजार २२० पदे भरलेली नाहीत.
- एकात्मिक बाल विकास प्रकल्प योजनंअंतर्गत मंजूर १ लाख ९९ हजार ४८८ पदांपैकी ९ हजार ६२५ (४.८२ टक्के) पदे रिक्त

# बाल विकास कार्यक्रम

बाल विकास कार्यक्रम हा द्विस्तर विभागलेला आहे. १. शासकीय व २. निमशासकीय. हा कार्यक्रम बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम,२०००च्या अनुषंगाने अंमलात आणला जातो. या कायद्यान्वये मुख्यत: उन्मार्गी, अवखळ, भटकी, निराश्रित वाममार्गाला लागण्याच्या सीमेवर असलेली बाल गुन्हेगार इत्यादी मुलांचे संरक्षण, शिक्षण, संगोपन व भावी आयुष्यात जबाबदार नागरिक बनविण्याच्या हेतूने उपाययोजना केली जाते. या प्रकारची सर्व मुले व मुली प्रथमत: निरीक्षण गृहात/बालगृहात आणली जातात व त्यांची प्रकरणे बाल न्याय मंडळाकडे किंवा बाल कल्याण समितीकडे योग्य त्या कारवाईसाठी पाठविली जातात. बाल न्यायालय व बाल कल्याण मंडळ प्रत्येक मुलाचे अगर मुलीचे प्रकरण पूर्णत: समजून घेऊन योग्य ती कारवाई करते. काही मुलांना जामिनावर सोडतात काही मुलांचे बाबतीत परिविक्षा अधिकाऱ्याचे देखरेखीखाली सोडतात. मुलांचे/मुलींचे बाबतीत वयाचे अठरा वर्षापर्यंत बालगृहात अगर विशेष गृहात शिक्षण व भावी आयुष्यात स्वत:च्या पायावर उभे राहून आपला चरितार्थ योग्यरीतीने चालविण्याच्या हेतूने पाठविली जातात.

शासकीय बालगृहात अगर शासनाने मान्यता दिलेल्या स्वयंसेवी बालगृहात वरील प्रकारच्या मुलांना अन्न, वस्त्र, निवारा, संरक्षण, वैद्यकीय सेवा, शालेय शिक्षण, धंदेशिक्षण इतर सर्वप्रकारचे सहाय्य देऊन समाजात मानाने जगण्यासाठी योग्य असे बनविण्यात येते.

### शासकीय बालगृहे व विशेष गृहे

*(तक्ता क्र ५)*

| वर्ष | बालगृह संस्थांची संख्या | | | सामावण्याची क्षमता | | | प्रवेशितांची हजर संख्या | पुनर्वसन | | एकूण खर्च (रु.हजारात) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | | मुले | मुली | |
| २०१२-१३ | १८ | १० | २८ | २,०५० | ९४० | २,९९० | २,१३० | ६२४ | २८१ | ९९,१९७ |
| २०१३-१४ | ०२ | ०१ | ०३ | २०० | १०० | ३०० | १४२ | ३८ | १२ | ६४,५२१ |
| २०१४-१५ | ०२ | ०१ | ०३ | २०० | १०० | ३०० | १८५ | ४३ | १७ | १७,६३८ |

(स्रोत : कार्यक्रम अंदाजपत्रक २०१४-१५) टीप: वर्ष २०१२-१३ मधील २८ संस्थांपैकी २५ संस्था एकात्मिक बाल संरक्षण योजनेमध्ये समाविष्ट झाल्या आहेत.

### शासकीय निरीक्षण गृहे

*(तक्ता क्र. ६)*

| वर्ष | निरीक्षण गृहांची संख्या | | | सामावण्याची संख्या | | | वर्षारंभीची संख्या | वर्षातील प्रवेशित संख्या | एकूण प्रवेशित संख्या | एकूण खर्च (रु.हजारात) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | | | | |
| २०१२-१३ | ११ | १ | १२ | ५५० | ५० | ६०० | ५२६ | ७८८ | १,५१७ | २८,८६७ |
| २०१३-१४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २०१४-१५ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |

*(स्रोत : कार्यक्रम अंदाजपत्रक २०१४-१५) टीप उपरोक्त १२ संस्था* एकात्मिक बाल संरक्षण योजनेमध्ये समाविष्ट झाल्या आहेत.

- वर्ष २०१२-१३ शासकीय निरीक्षण गृहामध्ये मध्ये सामावण्याची क्षमता ६०० असताना एकूण प्रवेशितांची संख्या ही ७८८ (३१.३३ टक्क्यांनी जास्त) होती.
- वर्ष २०१३-१४ मध्ये वरील सर्व संस्था या एकात्मिक बाल संरक्षण योजनेमध्ये समाविष्ट झाल्या आहेत.

# मूक कळ्यांवरील अत्याचार

## बालकांवरील अत्याचारांच्या गुन्ह्यांमध्ये १६ टक्क्यांची वाढ!

*तक्ता क्र. ७.बालकांवरील अत्याचाराचे वाढते गुन्हे*

| अ.क्र. | गुन्हे | वर्ष | | | २०११ च्या तुलनेत २०१२ मधील वाढ |
|---|---|---|---|---|---|
| | | २०१० | २०११ | २०१२ | (%) |
| १ | बालकांचे खून | २१४ | २०४ | २१२ | ३.९२ |
| २ | बालकांवरील बलात्कार | ७४७ | ८१८ | ९१७ | १२.१० |
| ३ | बालकांना पळवून नेणे | ७४९ | ८५८ | ८९३ | ४.०७ |
| ४ | मुलींचा ताबा मिळविणे | २६ | २० | ३१ | ५५ |
| ५ | वेश्या व्यवसायाकरिता मुली विकत घेणे | २७ | २० | ४ | -८० |
| ६ | भ्रूण हत्या | ५ | १२ | २२ | ८३.३४ |
| ७ | इतर गुन्हे | १२७७ | १२०८ | ११५७ | -४.२२ |
| | **एकूण** | **३०४५** | **३१४०** | **३२३६** | **३.०५** |

*(स्त्रोत : महाराष्ट्रातील गुन्हे-२०१२)*

- बालकांवरील बलात्कार या वर्ष २०११ च्या तुलनेत वर्ष २०१२मध्ये १२.१० टक्क्यांची वाढ.
- तसेच मुलींचा ताबा मिळविणे या गुन्ह्यात वर्ष २०१२ मध्ये गतवर्षीच्या तुलनेत ५५ टक्क्यांची वाढ झालेली दिसून येते.
- भ्रूण हत्या या गुन्ह्यात वर्ष २०११ च्या तुलनेत वर्ष २०१२मध्ये ८३.३४ टक्क्यांची वाढ.
- राज्यात बालकांवरील गुन्हे वर्ष २०११ मध्ये ३१४० इतके होते त्यात वाढ होऊन वर्ष २०१२ मध्ये ते ३,२३६ इतके झालेले आहेत. राज्य शासन बालकांवरील अत्याचाराला आळा घालत असल्याच्या घोषणा करीत असले तरी प्रत्यक्षात त्यांच्यावरील अत्याचारात वाढ होत आहे.

## बालिकांवरील बलात्कार

## एकूण बलात्काराच्या घटनांमध्ये बालिकांवर होणाऱ्या अत्याचारांचे वाढते प्रमाण!

*(तक्ता क्र.८)*

| अ.क्र. | वर्ष | वयोगट | |
|---|---|---|---|
| | | १० वर्षांखालील | १० ते १८ |
| १ | २ | ३ | ४ |
| १ | २०१० | १०८ | ६९४ |
| २ | २०११ | १३६ | ७०९ |
| ३ | २०१२ | १२७ | ७९७ |
| | **२०१२ चे २०१० शी प्रमाण** | **१७.५९** | **१४.८४** |
| | **२०१२ चे २०११ शी प्रमाण** | **-६.६२** | **१२.४१** |

*(स्त्रोत : महाराष्ट्रातील गुन्हे-२०१२)*

- १० वर्षांखालील बालिकांवरील बलात्काराच्या गुन्ह्यांत वर्ष २०१० च्या तुलनेत वर्ष २०१२ मध्ये वाढ झालेली आहे.
- वर्ष २०१२ मध्ये १० ते १८ वर्ष वयोगटातील बालिकांवरील बलात्काराच्या गुन्ह्यांचे प्रमाण हे वर्ष २०१० व २०११ च्या तुलनेत अनुक्रमे १४.८४ व १२.४१ टक्क्यांनी वाढल्याचे दिसून येते.